
# पाषाण युग

**पाषाण युग कधी अस्तित्वात होतं?**
पाषाण युग हा खूप मोठा कालखंड असून, त्यात ३० लाखांहून अधिक वर्षांचा काळ सामावला आहे. मानवासारखा प्राणी अस्तित्वात आला, तेव्हापासून ते सुरू झालं. त्याचा पहिला पुरावा आफ्रिकेत मिळाला आहे.






**पाषाण युगाचा काळ**
पूर्वाश्मयुग – सुमारे इ. स. पूर्व ३०,००,००० वर्षं
या काळात 'होमिनिड्स' आणि 'होमो हॅबिलिस' म्हणून ओळखले जाणारे मानव किंवा मानवासारखे प्राणी साधी अवजार वापरत होते. याच प्राण्यांपासून पुढे 'होमो सेपियन्स', म्हणजे आधुनिक मानव उत्क्रांत झाला.
मध्याश्मयुग - सुमारे इ. स. पूर्व १०,००० वर्षं
या काळातले लोक शिकारीवर आपली उपजीविका करत होते आणि त्यामुळे शिकार शोधण्यासाठी त्यांना सतत फिरावं लागत असे. साहजिकच हे लोक भटकं जीवन जगत होते.
नवाश्मयुग - सुमारे इ. स. पूर्व ४,५०० ते २,४०० वर्षं
या काळात शेतीला सुरुवात झाली, भांडी तयार होऊ लागली आणि गावं उभी राहू लागली.



**या काळाला पाषाण युग का म्हणतात?**
या काळात प्राचीन मानव अवजारे बनवण्यासाठी धारदार किंवा बारीक टोक असलेल्या दगडांचा वापर करत होता.
या संपूर्ण काळात अवजार बनवण्यासाठी प्रामुख्याने दगडांचाच वापर होत होता आणि म्हणून या युगाला 'पाषाण युग' म्हणतात.

पाषाण युगाचा शोध घेताना...




**तुम्हाला ठाऊक आहे?**
काही पुरातत्त्वशास्त्रज्ञांच्या मते, प्राचीन मानव एखाद्या प्राण्याचं पोट फाडत असत आणि त्याने घेतलेलं शेवटचं अन्न खात असत!

छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालय
बाल वस्तुसंग्रहालय
बँक ऑफ अमेरिका यांच्या उदार
सहयोगाने कार्यरत आहे

# पाषाण युगातील अवजार तयार करा

तुमच्या अवजाराचे चित्र काढा.
तुमचं साहित्य एकमेकांशी कसं आणि कुठे जोडलं जाणार आहे?



तुम्ही कोणतं साहित्य वापरणार आहात?

तुमचं अवजार कसं काम करणार आहे?
तुम्ही काढलेल्या चित्रावर योग्य जागी ते लिहा.

पुढे काय...?
तुमचं पाषाण युगातील अवजार अधिकाधिक चांगलं कसं बनवाल?

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| र | पा | स | भा | ला | नी | व | ह | क | मॅ |
| ग | पु | स्म | या | ड | द | ड | अ | गे | म |
| ओ | ण | रा | वं | ऋ | ल | ळ | व | ओ | थ |
| फ | च | क | श्म | भ | जी | उ | जा | ओ | ज |
| ळ | का | पु | ब | यु | व | क | र | क्ष | य |
| जी | ट | दा | सं | ई | ग | झ | डी | कं | ट |
| फ | ह | गि | इ | ए | का | र | द | ग | ड |
| प | लं | ने | सा | फ | त | ऊ | ता | ळ | ऋ |
| गु | य | क | ग | न | वा | श्म | यु | ग | क्ष |
| फा | द | ए | श | ट | ब | ओ | ळ | य | री |

**शब्दकोडे**

१. भाला
२. मॅमथ
३. पुराशमयुग
४. अवजार
५. दगड
६. गुफा
७. नवाश्मयुग
८. दागिने